# जाहिरात

## राष्ट्रीय आरोग्य अभियान

## उपसंचालक, आरोग्य सेवा , नागपूर मंडळ, नागपूर.

---

उपसंचालक, आरोग्य सेवा, नागपूर मंडळ, नागपूर राष्ट्रिय आरोग्य अभियानाअंतर्गत नागपूर/ वर्धा/ चंद्रपूर/ गडचिरोली/ भंडारा/ गोंदिया या जिल्हयाकरिता कोरोना विषाणु (कोव्हिड-१९) प्रादुर्भाव लक्षात घेता उद्रेक सदृश्य परिस्थीती हाताळण्यासाठी खालील तक्यात दर्शविल्याप्रमाणे कंत्राटी व करारपध्दतीने मानधन तत्वावर खालील पदासाठी पात्र उमेदवारांकडुन अर्ज मागविण्यात येत आहे.

| अ. क्र. | पदाचे नांव | शैक्षणिक अहर्ता | मानधन | अजा | अज | वि जा-अ | भ ज-ब | भज -क | भज -ड | विमा प्र | इमा व | एसई बीसी | ईड ब्ल्युए स | खुला | एकुण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | फिजीशियन | MD (Medicine) | 75000 + performance | 9 | 5 | 2 | 2 | 3 | 1 | 1 | 13 | 9 | 7 | 17 | 69 |
| 2 | भुलतज्ञ | Degree / Diploma in Anaesthesia | 75000 + performance | 5 | 2 | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 7 | 5 | 3 | 9 | 36 |
| 3 | वैद्यकीय अधिकारी (एमबीबीएस) | M.B.B.S | 60000 | 44 | 24 | 10 | 8 | 12 | 7 | 7 | 64 | 44 | 34 | 85 | 339 |
| 4 | आयुष वैद्यकीय अधिकारी (बीएएमएस) | BAMS/ BUMS | 30000 | 59 | 31 | 14 | 11 | 16 | 9 | 9 | 86 | 59 | 45 | 113 | 452 |
| 5 | हॉस्पीटल मॅनेजर | Any Medical Graduate with MPH/MHA/ MBA with one year Experience of Hospital Administration | 35000 | 18 | 10 | 4 | 4 | 5 | 3 | 3 | 27 | 18 | 14 | 35 | 141 |
| 6 | अधिपरिचारिका | GNM/ B.Sc.Nursing | 20000 | 318 | 171 | 73 | 61 | 86 | 49 | 49 | 465 | 318 | 244 | 611 | 2445 |
| 7 | क्ष-किरण तंत्रज्ञ | Retired X-Ray Technician | 17000 | 6 | 3 | 1 | 1 | 2 | 1 | 1 | 8 | 5 | 4 | 11 | 43 |
| 8 | ई.सी.जी.तंत्रज्ञ | B.Sc. with Physics/Chemistry/Biology and Experience of ECG Technician at least One Year | 17000 | 5 | 3 | 1 | 1 | 2 | 1 | 1 | 8 | 5 | 4 | 11 | 42 |
| 9 | प्रयोगशाळा तंत्रज्ञ | B.Sc. DMLT from Govt. Recogmnised Institute | 17000 | 20 | 10 | 5 | 4 | 5 | 3 | 3 | 29 | 20 | 15 | 38 | 152 |
| 10 | औषध निर्माता | D.Pharm / B. Pharm | 17000 | 24 | 13 | 5 | 5 | 6 | 4 | 4 | 35 | 24 | 18 | 45 | 183 |
| 11 | स्टोअर ऑफिसर | Any Graduate with one year Experience as Store Officer | 20000 | 19 | 10 | 4 | 4 | 5 | 3 | 3 | 27 | 18 | 14 | 36 | 143 |

| | | | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 12 | डाटा एन्ट्री आपरेटर | **Any Graduate with 30wpm Marathi Typing & 40 wpm English Typing and MSCIT** | **17000** | 24 | 13 | 5 | 5 | 6 | 4 | 4 | 34 | 23 | 18 | 45 | 181 |
| 13 | वार्ड बॉय | **10th Pass** | **Daily waes Rs.400/- day** | 122 | 66 | 28 | 23 | 33 | 19 | 19 | 178 | 122 | 94 | 235 | 939 |

टिप:- अ.क्र.७ वरील पदाकरिता सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांने अर्ज करावा.

<u>सर्वसाधारण अटी व शर्ती :-</u>

१. नागपूर/ वर्धा/ चंद्रपूर/ गडचिरोली/ भंडारा/ गोंदिया जिल्हयातील सक्षम, काम करण्यास तयार आणि मधुमेह/उच्च रक्तदाब/ह्रदयविकार, इ. नसणाऱ्या सेवानिवृत्त कर्मचारी/अधिकारी, बॉड संपलेले डॉक्टर व नर्सेस यांना सदर पदभरतीकरिता प्राधान्य देण्यात येईल सेवानिवृत्त अधिकारी/कर्मचारी यांनी अर्जात सेवानिवृत्त अधिकारी/कर्मचारी यांचे संपुर्ण नांव, संपुर्ण पत्ता, मोबाईल क्रमांक, मेल आयडी, जन्म दिनांक, शासकीय सेवेतुन ज्या पदावरुन सेवानिवृत्त झाले त्या पदाचे नांव व संस्थेचे नांव, सेवानिवृत्तीचा दिनांक, शासकीय सेवेतून सेवानिवृत्त झाल्याचा पुरावा, वरील नमुद आजार नसल्याबाबत स्पष्ट उल्लेख करण्यात यावा. तसेच बॉड संपलेले डॉक्टर व नर्सेस यांनी अर्जात यापुर्वी केलेल्या सेवेचा संपुर्ण तपशिल नमुद करावा. सदर कर्मचारी अनुभवी असल्यामुळे त्यांची यादी तयार करुन त्यांच्या आरोग्य विषयक सेवा लगेचच घेता येईल. या कर्मचाऱ्यांनी को-या कागदावर अर्ज करुन अ.क्र.२ मध्ये नमुद मेल आयडीवर दिलेल्या मुदतीत सादर करावेत.

२. नव्याने अर्ज करणाऱ्या उमेदवारांनी ए-४ साईज कागदावर संगणकीकृत किंवा टंकलिखीत केलेल्या सोबत जोडलेल्या विहित नमुन्यातील अर्जातच परिपुर्ण माहिती भरुन अर्ज व संपुर्ण आवश्यक दस्ताऐवज स्कैन (Scan) करुन <u>दि.१९.०४.२०२० रोजी सायं. ०६.०० वाजे पर्यंत</u> "उपसंचालक, आरोग्य सेवा, नागपूर मंडळ, नागपूर" यांच्या नांवाने <u>covid19ddhsnagpur@gmail.com</u> या मेल आयडीवर सोबत दिलेला अर्ज, इतर शैक्षणिक अर्हतेची कागदपत्रे एकाच PDF फाईलमध्ये सादर करावे. उमेदवारांनी ई-मेलच्या विषयामध्ये "Application for the post . . . . . . . . . . . ." असे स्पष्ट नमुद करावे. विहित मुदतीनंतर ई-मेलव्दारे प्राप्त झालेले अर्ज आणि अपुर्ण माहितीचे अर्जाचा विचार केला जाणार नाही.

३. <u>उमेदवारांचे अर्ज फक्त ई-मेलद्वारे स्वीकारण्यात येईल. अर्ज पोष्टाद्वारे, कुरीयर अथवा प्रत्यक्षात (By Hand) स्वीकारण्यात येणार नाही.</u>

४. सर्व उमेदवारांनी सोबत जोडलेल्या अर्जाच्या नमुन्यात (एनएचएम च्या वेबसाईट वर उपलब्ध अर्जाचा नमुना ) अर्ज करणे बंधनकारक राहील.

५. अर्जासोबत १) वयाचा पुरावा २)पदवी/पदवीका प्रमाणपत्र ३) शेवटच्या वर्षाची गुणपत्रिका ४) संबंधित पदांकरिता तत्सम कौन्सीलचे नोंदणी प्रमाणपत्र जोडणे बंधनकारक राहील ५) शासकिय/ निमशासकिय संस्थांमध्ये केलेल्या कामाचे अनुभव प्रमाणपत्र एवढीच कागदपत्रे सादर करावीत.

६. उमेदवारांची निवड झाल्यास त्यास कोविड १९ साठी नेमणुक देण्यात येणार असुन त्यांची नेमणुक ही कोविड १९ साथ कालावधीपुरतीच राहणार असुन सदर साथ कमी झाल्यास किंवा रुग्णालयातील

कोविड १९ उपचार कक्ष बंद झाल्यास सदरील नेमणुक आपोआप संपुष्टात येईल. त्यासाठी १ महिन्याची नोटीस दिली जाणार नाही.

७. पदासमोर नमूद मानधन हे एकत्रीत मानधन असून त्याव्यतिरिक्त इतर कोणतेही भत्ते देय राहणार नाही.

८. विशिष्ट मागास प्रवर्गाचा उमेदवार उपलब्ध झाला नाही तर गुणानुक्रमे सर्वात वर असलेल्या इतर कोणत्याही मागास प्रवर्गाच्या उमेदवाराची निवड करण्यात येईल. एकही मागास प्रवर्गाचा उमेदवार उपलब्ध न झाल्यास खुल्या प्रवर्गातील उमेदवाराची गुणवत्तेनुसार नेमणुक करण्यात येईल.

९. राष्ट्रिय आरोग्य अभियानाच्या कर्मचा-यांसाठी असणारे करारपत्र भरुन देणे बंधनकारक राहील.

१०. ई-मेल व्दारे प्राप्त झालेल्या अर्जावरुन व उमेदवारांच्या शैक्षणिक अर्हतेवरुन मेरीट लिस्ट तयार करण्यात येईल. मेरीट लिस्ट तयार करतांना Quqlifying Exam मध्ये मिळालेले गुण + उच्च शैक्षणिक अर्हता + शासकिय/निमशासकिय कार्यालयाचा अनुभव या बाबींचे गुण एकत्र करुन मेरीट लिस्ट तयार करण्यात येवुन संबंधित पात्र उमेदवारास नियुक्ती आदेश निर्गमित करण्यात येईल.

११. मेरीट लिस्ट तयार झाल्यानंतर ती www.nrhm.maharashtra.gov.in व www.arogya.maharashtra.gov.in या Website वर प्रसिध्द करण्यात येईल. तसेच त्याचदिवशी आक्षेप मागविण्यात येईल. दुस-या दिवशी आक्षेपाचा विचार करुन त्याच दिवशी Final Merit List तयार करण्यात येईल.

१२. कोरोना विषाणु (कोव्हिड-१९) प्रादुर्भाव लक्षात घेता उद्रेक सदृश्य परिस्थीती हाताळण्यासाठी COVID Care Centre (CCC), Dedicated COVID Health Centre (DCHC), Dedicated COVID Hospital (DCH) या संस्थामध्ये सेवानिवृत्त कर्मचारी/अधिकारी यांची प्राधान्यक्रमाने नियुक्ती करण्यात येईल.

१३. अर्जदार हा संबंधित पदासाठी शारिरीक व मानसिकदृष्टया सक्षमअसावा तसेच अर्जदाराविरुध्द कोणताही फौजदारी गुन्हा दाखल झालेला नसावा.

१४. उमेदवारांनी अर्ज करित असलेल्या पदांचे नाव व सामाजिक आरक्षनानुसार सदर पदांकरिता नमुद प्रवर्ग ( जातीचा प्रवर्ग) तसेच अर्ज कोणत्या जिल्हयाकरिता सादर करित आहेत याबाबी अर्जामध्ये स्पष्टपणे नमुद करण्यात यावे.

१५. सदर रिक्त पदांच्या संख्येत, सामाजिक आरक्षण तसेच पदस्थापनेच्या ठिकाणामध्ये बदल करण्याचे सर्व अधिकार हे या कार्यालयाचे असुन निवड प्रक्रियेत कोणत्याही क्षणी बदल करण्याचे अधिकार उपसंचालक, आरोग्य सेवा, नागपूर मंडळ, नागपूर यांनी राखुन ठेवलेले आहेत.

१६. पुनर्नियुक्तीबाबत, शासकिय नियमित सेवेत सामावून घेणेबाबत किंवा शासनामार्फत सेवा संरक्षणाबाबत उमेदवारांना कुठलाही दावा करता येणार नाही.

१७. अर्जदाराला कंत्राटी कालावधीत त्यांचे सोईनुसार ठिकाण बदलून मिळण्याची मागणी करता येणार नाही. नियुक्ती दिलेल्या उमेदवारांना त्यांना दिलेल्या कार्यक्षेत्रात मुख्यालयी राहून सेवा देणे बंधनकारक राहील.

१८. सद्यस्थितीत जिल्हा सीमा बंद असल्याने व सार्वजनिक वाहतूक व्यवस्था बंद असल्याने शक्यतो जिल्हयातीलच उमेदवारांनी अर्ज सादर करावे.